# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : desk2a@dtemaharashtra.gov.in Internet :http/www.dtemaharashtra.gov.in


महत्वाचे तात्काळ

क्रमांक : २अ/एडीएम/२०१७/८२८
दिनांक : 3 AUG 2017

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर

विषय : शासकीय /अशासकीय अनुदानीत व विद्यापीठ विभाग किंवा विद्यापीठ संचालित संस्थेतील रिक्त जागांवर प्रवेश करण्याबाबत ..

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये विविध व्यावसायिक पदवी व पदव्युतर पदवी अभ्यासक्रमांच्या सर्व प्रवेश फे-या पूर्ण झाल्यानंतर शासकीय व अशासकीय अनुदानीत तसेच विद्यापीठ व्यवस्थापित संस्थामध्ये रिक्त राहीलेल्या जागा भरण्याबाबत या संचालनालयास विचारणा करण्यात येत आहे.

या अनुषंगाने कळविण्यात येते की, शासनाने व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश नियमावली असाधारण राजपत्र क्रमांक १०३,१०४,१०५ अन्वये प्रसिध्द केलया आहेत. तसेच शासन अधिसूचना उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक टीईएम- २०१६/ प्र.क्र ४७३/१६)/ तांशि-४, दिनांक २५.४.२०१७ अन्वये सदर प्रवेश नियम शासकीय /अशासकीय अनुदानीत व विद्यापीठ विभाग किंवा विद्यापीठ संचालित संस्थेतील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठीही लागू असतील असे स्पष्ट केले आहे. सदर प्रवेश नियमावलीतील तरतूदीनुसार आपल्या विभागाच्या अधिनस्त शासकीय /अशासकीय अनुदानीत व विद्यापीठ विभाग किंवा विद्यापीठ संचालित संस्थेतील रिक्त जागासंदर्भातसुध्दा संबंधित संस्थांच्या प्राचार्यांना शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील प्रवेश माहीती पुस्तिका व प्रवेश नियमावलीनुसार Cut Off दिनांकापूर्वी कार्यवाही करता येईल.

(दयानंद मेश्राम)
सहसंचालक तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीस्तव सादर

\\DTENS1\Desk2a\2017-18\Regarding Vacant seat A Y 2017-18.docx